UPA
IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची वैशिष्ट्ये

**डॉ. राखी मंगेश जाधव**
व्ही.एम.व्ही. कामर्स, जे.एम.टी. आर्टस,
जे.जे.पी. सायन्स महाविद्यालय, नागपूर.

स्त्रीचे शोषण करणाऱ्या समाजरचनेचे तिच्या मूल्यसरणीचे स्वरूप काय होते? धार्मिक सामाजिक आर्थिक आणि लैंगिक असे सर्व पातळ्यावर स्त्रीचे शोषण करणारी समाजरचना समजून घ्यायला हवी स्त्रीला तिच्या गुलामीचा गौरव आणि दुय्यममत्वाला सन्मान मानायला शिकविणारी ही समाजरचना एखाद्या अवघड कोड्यासारखी आहे. धर्माने स्त्रीला गुलामीने मंडीत केले पण त्या धर्माचा तिला केवढा तरी गर्व वाटतो. उच्चवर्णाची स्त्री शूद्र असते शोषितांची स्त्री तर अतिशूद्र किंवा गुलामांची गुलाम असते. हिंदू कोड बिल या तिच्या मुक्तीच्या जाहिरनाम्याविरूद्ध स्त्रियांनीच मोर्चा काढला होता. अलिकडच्या काळातही नवहिंदूत्ववादी संघटना मध्ये स्त्रिया बहुसंख्येने सहभागी होताना दिसतात. ओबीसी स्त्रियांच्या आरक्षणाला उच्चवर्णीय स्त्रिया विरोध करतात. मंडल विरोधकांमध्ये सामील होतात. धर्मात स्थान मागितले जाते. स्त्रियांवर केवढी बंधने लादली होती. जातीत विवाह, बालविवाह, विधवा केशवपन, सतीप्रथा, पुनर्विवाहास बंदी, शिक्षण बंदी या सर्व बंधनांनी स्त्रीचे पंखच पार कापून टाकले होते. माणुसपणाशी तिचे वियोगीकरण झाले होते.

जोतीराव आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीमुक्तीसाठी मूलभूत पातळीवरून कार्य केले. डॉ. आंबेडकरांनी विधीविधानाच्या पातळीवरून स्त्रीच्या मुक्तीचा जाहीरनामा सादर केला. देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांना मजुरी करणाऱ्या स्त्रियांना आणि अज्ञानाच्या अंधारात बुडालेल्या स्त्रियांना आंबेडकरांनी मुक्तीचा प्रकाशमार्ग दाखविला. तिच्या विषमतेचे सर्व दोरच कापून टाकले. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या युगवाक्याने आग पसरविली आणि स्त्रिया शिकू लागल्या खालच्या वर्गातील पीडित समाजामधील स्त्रियांना या वाटेवरून आत केवळच चालता येवू लागले असे नाही तर धावताही येवू लागले आहे. अनेक स्त्रिया शिकल्या पुरूषाबरोबर कर्तृत्वाच्या क्षेत्रात वावरू लागल्या. छोटी–मोठी मानाची पदे भुषवू लागल्या बहिष्कृत समाजातील स्त्रिया शिक्षिका झाल्या कार्यकर्त्या झाल्या. महाविद्यालयाच्या अध्यापिका झाल्या. डॉक्टर्स झाल्या, इंजिनिअर्स झाल्या आणि स्त्रिया परिवर्तनाची संस्कृती निर्माण करणाऱ्या साहित्यनिर्मितीत सामील झाल्या.

आंबेडकरवादी कवयित्रीच्या कवितेच्या स्वरूपाचा विचार करताना जवळपास चाळीस वर्षातील कवयित्रीच्या कवितांचा विचार करता येईल. साधारणत: १९७० च्या दशकात कवयित्री कविता लिहू लागल्या. सुरूवातीच्या काळातील लेखक हे दलित चळवळीतील कवींच्या कवितांच्या अनुकरणातून आलेले दिसते. याशिवाय समकालीन मराठी काव्याचाही प्रभाव या कवितांवर असलेला दिसून येतो. उत्तरोत्तर या बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक पर्यावरणानुसार आंबेडकरवादी कवयित्रीची कविता बदलते.

आंबेडकरवादी साहित्यप्रवाहाच्या प्रारंभीच्या काळात कवींच्या कविता शतकानुशतकांचे समाजाचे दु:ख अभिव्यक्त करतात असा जोरकसपणा कवयित्रीच्या लेखनाच्या सुरूवातीला आलेला दिसत नाही. फुले–आंबेडकरांच्या विचाराचे अधिष्ठान या काव्यनिर्मितीमागे असले तरीदेखील वाङ्मय निर्मितीवर परिणाम

करणाऱ्या वाङ्मयबाह्य पेचामुळे कवयित्रीच्या कविता या काळात सावधपणे अभिव्यक्त होताना दिसून येते. असे असले तरीदेखील सुरवातीच्या काळात या काव्यलेखनाने आंबेडकरवादी कवियत्रिच्या कवितेची पायाभरणीच केले असे म्हणावे साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध अविभाज्य स्वरूपाचा असतो. ज्याकाळात साहित्यनिर्मिती होते त्याकाळातील सामाजिक संदर्भाचा, घटना घडामोडीचा प्रभाव साहित्यनिर्मितीवर पडत असतो. त्याचप्रमाणे साहित्य देखील समाजातील घटनांवर प्रभाव पाडीत असते. आंबेडकरवादी कवयित्रींच्या १९७० ते २०१० या कालखंडातील कवितांच्या स्वरूपाचा विचार केल्यास याच प्रत्यय सहजपणे येतो.

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविताचा विचार या संशोधन पेपरमधून केला आहे. परंतु शब्दमर्यादा असल्यामुळे काही कवयित्रींच्या कवितांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

हिरा बनसोडे यांचे 'पोर्णिमा' (१९७०) आणि 'फिर्याद' (१९८४) हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. एकूणच आंबेडकरवादी कवितेत हिराबाई यांच्या कवितेला मानाचे स्थान आहे. बहिष्कृत म्हणून आणि स्त्री म्हणून कवयित्रीच्या वाट्याला आलेले अनुभव त्यांच्या काव्यातून बोलके होतात. या देशात स्त्री गुलाम आहे तिच्या स्वप्नांची मुक्त पाखरे मारली जातात. हिराबाई म्हणतात,

"ही माझी फिर्याद
आमच्या कर्मठ संस्कृतीवर आहे.
जिने आम्हाला बहिष्कृत बंद कोठडीत कैद केले आहे.
जिथे आम्हाला बहिष्कृत आयुष्याचे दान आहे.
जिथला वारा आम्हाला परक्यासारखा वागवितो.
जिथला पाऊस आम्हाला फक्त दुष्काळच देतो.
जिथले पाणी आमच्याशी मृगजळाचा जीवघेणा खेळ खेळते.
आणि म्हणून त्या वरील फिर्याद करूनच थांबत नाही तर
"क्रांतीची बिजली पेरली आहे
प्रत्येक घायाळ हृदयात
ही लढाई अटळ आहे ......अटळ आहे."

आणि युद्धाची अटळता मांडून ठेवतात. "लोकहो तुमच्या न्यायालयात मी फिर्याद आणली आहे तुम्ही तरी मला न्याय द्याल का? माझ्या अंगाअंगावर झिरपतात अपमानाच्या खोल जखमा, आमची इज्जत लुटली जात आहे, जातीयतेच्या धर्मांध व्यासपीठावर आमचे शील जळत आहे. धर्मग्रंथाच्या पानापानावर हा पराजित इतिहास बदलण्यासाठी आव्हान देणारे बलदंड हात तुम्ही तरी द्याल का....

लोकहो ! तुम्ही" तरी न्याय द्याल का?"

हा आकांत आंबेडकर समाजातील जागृत स्त्रीमनाचा आहे हा स्त्रीच्या मुक्तीचा आक्रोश आहे. तो अस्वस्थ करणारा आहे.

"धुवून टाका चेहऱ्यावरचा भयग्रस्त अंधार
प्रकाशाचे दिवे आणलेत मी तुमच्यासाठी
तुमच्यासाठी मी सुर्योदय आणला."

अशा आंबेडकरसूर्याचा संदेश त्या आपल्या शब्दांमधून उजळत ठेवतात हिराबाईची कविता आंबेडकरवादी कवितेतली जाणीवसंपन्न आणि प्रगल्भ कविता आहे.

कवयित्री सुगंधा शेंडे यांचे 'विरक्त धुकं', 'आम्रपाली भावपल्लवी' आणि 'अग्नीशिखा' हे तीन काव्यसंग्रह आहेत. स्वातंत्र्य मिळूनही 'मन जळत का? हा प्रश्न ही कवयित्री विचारते कवयित्री 'आम्रपाली भावपल्लवी' मध्ये सांगते 'दहावी माझी ओवी बौद्ध धम्माला' ती गाते. जोतीबांनी लावलेली ज्योत तेवत ठेवण्याची प्रतिज्ञा ही भगिनी करते. आंबेडकरवादी कवयित्री ही सर्वच प्रकारच्या भेदभावांना मूठमाती देऊ इच्छिते म्हणूनच सुगंधा शेंडे,

"कणकण पिऊनी तव तेजाचा
रोम रोम ते जाळून यावर
या तेजाच्या प्रज्वलतेने
विलया न्यावे भेदभावा"

अशी आपल्या आयुष्याची आणि काव्याची प्रतिज्ञा चेतवून ठेवतात.

ज्योती लांजेवार या आंबेडकरवादी कवितेतील तिसऱ्या महत्त्वाच्या कवयित्री होत. त्यांचे 'दिशा' आणि 'शब्दनिळे आभाळ' हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. अस्पृश्य आणि स्त्री अशा दूहेरी भोगवट्याचे आकंदन ज्योती लांजेवार यांच्या कवितेतूनही प्रभावीपणे व्यक्त झाले आहे.

"आता मी भडकवणार आग
माणूसकीच्या हक्कासाठी
मला पातकी म्हटलं तरी चालेल."

अशी विद्रोहाची आग त्यांच्या कवितेत आहे. समाजातील शब्दशूरांवर आणि वाणिवीरांवर त्या प्रहार करतात उपरोधाचे शस्त्र परजतात निर्वाणीच्या भाषेत, उत्कट मनाने उधळलेल्या ठिणग्या असे लांजेवार यांच्या आंबेडकरवादी कवितेचे रूप आहे.

सुरेखा भगत यांचा 'साक्ष' हा पहिला संग्रह अलीकडेच प्रकाशित झाला. भोवतीच्या दु:खाने सुरेखा भगत यांचेही मन विव्हळ झाले आहे. त्या म्हणतात,

'जिथे दिशांचा येतो आक्रोश कानावर
तेथील मुक्यांची अगतिकता साहू
चल तिथे जाऊ
ज्यांच्या मनी दु:खाचे सावट
त्यांच्या अंत:करणी प्रीतीची फुंकर घालू
चल तिथे जाऊ"

पण याहीपेक्षा त्या दु:खाचे उगमच बंद करण्याची भूमिका घेतात. बुद्धाच्या आणि बाबासाहेबांच्या क्रांतीसूत्रांना अवलंबविणारी आणि दु:खमुक्तीच्या रसायनाचा अंगिकार करणारी ही कविता

"दु:खितांचे आसू पुसण्याऐवजी
आसू येणेच थांबविले पाहिजे"

असे म्हणते ते मोठे अन्वर्थक आहे.

एकूण सुरेखा भगत या कवयित्रीची कविता संवेदनशील स्वभावाची आहे. शांत मनाचे अनुभव ती मांडते.

प्रज्ञा लोखंडे यांचा 'अंत:स्थ' हा काव्यसंग्रह आंबेडकरवादी कवितेतील एक महत्वाचा काव्यसंग्रह आहे. परंपरेच्या चिरेबंदी वाड्याला हादरे देत आंबेडकरवादी कवितेचे वादळ आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या कवितेला 'अत्त दीप भव' ची क्रांतीदिशा दिली होती ही स्त्री मुक्तीची दिशा होती. धर्म, रूढी, संस्कार, परंपरा अशा कोणत्याही रूपात वावरणारे पिंजरे आंबेडकरवादाला मान्य नाहीत. हे पिंजरे स्त्रीला आणि असंख्य पुरूषांनाही माणूसपणापासूनच वंचित करून ठेवतात. आंबेडकरवादाने प्रज्ञा लोखंडेलाही प्रतिभेला हे 'अंत:स्थ' भान दिले आहे.

"आपल्यातच किती अंत:स्थ कप्पे
वावरत असतात
एकमेकांना अनोळखी असतात."

असे म्हणणारी ही कवयित्री स्त्रीमनाचे हे कप्पे या नेणिवा शब्दातून फुलविण्याचा वसा घेते. शंबुकाच्या वधाचे दु:ख कवयित्रीला दिसले आहे आणि शंबुकाच्या विद्रोहाचा सूर कवयित्रीला जाणवला आहे. म्हणूनच चौकट मोडण्याची शिक्षा भोगणाऱ्या शंबुकाला ती म्हणते.

"शंबूका,
मी वाट पाहतेय
इतिहासाच्या पानावर
तू पेरून ठेवलेल्या
सुरूंगाच्या दाहक स्फोटाची"

बहुजनाची येथील अध्यात्मवादी अभिजन संस्कृतीने वाताहातच केली बहुजनांमधील ही दु:खे एकत्र यावीत त्यांनी स्वयंप्रकाशी व्हावे ही कवयित्रीची कळकळ आहे. ती म्हणते.

"तुझ्या ओसाड छावण्यांना
आता तरी स्वत:चा प्रकाश दे"

कारण ती पाहते भोवतीची स्वार्थांधता प्रतिक्रांतीवाद्यांनी खिशात घातलेले पाळीव कर्नल पाळीव प्राण्यांसारखे प्रतिक्रांती वाद्यांच्या दारात राहणारे परंपरावाद्यांच्या हुकूमाने परिवर्तनवाद्यांवर भुंकणारे आणि आंबेडकरवादाचा मुखवटा चढवून मिरवणारे. या लोकांचे आतले चेहरे लगेच उघड होतात ते अमिषामागे धावतात असे प्रतिक्रांतीवाद्याचे तुकडे चघळणारे पाळीव कर्नल हे प्रतिक आहे, आंबेडकरी चळवळीला हिंदूत्वाच्या खुंटाला बांधण्याचा कार्यक्रम राबवणारांचे! कवयित्री म्हणते

"हस्तिदंती सापळ्यात
कर्नलच्या क्रांतीला
कीड लागली
बेलगाम उधळणाऱ्या
अबलख घोड्यावर
मध्यमवर्गीय झूल पांघरली"

असे आपले काही मेणाचे छोटे छोटे कर्नल आंबेडकरविरोधी छावण्यांमध्ये सामील झाले.

प्रज्ञा लोखंडेची कविता अत्यंत प्रगल्भ आहे. शांत आहे ती एकसूरी होत नाही. पण आंबेडकरसूत्रेही सोडीत नाही. हे या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

उषाकिरण आत्राम यांचा 'म्होरकी' हा कवितासंग्रह १९९७ साली प्रकाशित झाला. कवितासंग्रहाला लिहिलेल्या मनोगतात या आदिवासी भगिनीने म्हटले आहे. "शिकायला जिद्द मात्र खूप होती. डॉ. बाबासाहेबांचं उदाहरण डोळ्यापूढे असायचं आणि नवं बळ, नव जिद्द प्रेरणा आपोआप मिळायची, याच मनोगतात "फूले–आंबेडकर साहित्याशी स्वत:च नातं त्या बंधुत्वाशी नाळाचं नातं जुळवूनच माझी लेखनी मी चालवीतं असते" असे ती म्हणते या प्रेरणांनी तिला नव्या, युगंधर जाणिवांशी जोडले. तिला आदिवासी बांधवांसोबत स्त्रिया, दलित या सर्वांचेच दु:ख दिसले. तिला लाभलेली ही नजर क्रांतीची होती. रानाचा तिसरा डोळा तिला लाभला होता आणि तो आमूलाग्र परिवर्तनाचा होता. ती बिरसा मुंडाला म्हणते–

"इथं सूर्य अजूनही नाही रे पोचला
बिरसा! सूर्यकमळांचा तलाव नाही रे फुलला
अंधारात एकेका रात्री
किसून निघतो रे एकेक जीव, काकडी कंदासारखा"

उषाकिरणच्या प्रतिभेने फुलवलेले हे काव्यलावण्य मोठे भेदक आहे 'स्वतंत्र भारता! आम्हास मिळेल का न्याय" असा जिवंत प्रश्न ती स्वातंत्र्यावर भिरकावते पण या कवयित्रीला हेही दिसते की आता लढाई आपणच जन्माला घातली पाहिजे.

कुसुम आलाम या आदीवासी भगिनीचा 'रानआसवांचे तळे' हा लक्षणीय काव्यसंग्रह १९९८ साली प्रकाशित झाला.

आंबेडकरवादी साहित्य चळवळीने साहित्यातून अंगार फूलवला तसा आपणही फुलवला पाहिजे असे कुसुम आलाम यांना वाटले आहे. आणि कुसूम आलाम नावाचे एक सामूहिक दु:ख त्यांच्या कवितेतून साकार झाले आहे. आपण विद्रोही कवयित्री आहोत याचा त्यांना गर्व आहे आणि जोवर विषमता आहे तोवर हा विद्रोह विश्रांती घेणार नाही ही त्यांची भूमिका आहे. त्यांच्या रानआसवांच्या तळे या कवितेत फक्त अश्रूच नाहीत तर या अश्रूतून फुलणाऱ्या ठिणग्या आहेत. विद्रोहाच्या ज्वालांची दाहक फुलेही त्यात आहेत. अश्रूंचे हे तळे आता पूर्वीप्रमाणे आटणार नाही. रानातील दु:खाच्या आसवांचे हे तळे क्रांतीसाठी पेटून उठू लागले आहे. याची मोठी आश्वासक साक्ष 'रानआसवांचे तळे' मधून आपल्याला मिळते.

उल्हासीनी कांबळे यांच्या कवितासंग्रहातून कवयित्री भोवतीच्या समाजातील अत्याचार पाहून ती कवितेतून मांडते या देशातील देवाने आणि अध्यात्माने समाजाचे वाटोळे केले हे सांगणारी ही कवयित्री आंबेडकरवादाचे मध्यवर्ती सूत्र फुलवून ठेवते एवढेच नव्हे तर

"जग हे ज्वालामुखी आहे
स्त्री ही उफान्ता रस आहे"

या ओळीतून स्त्रीशक्तीची ओळखही ती करून देते या आणि अशाच अनेक कवयित्रींनी आंबेडकरवादी कविता समृद्ध केली आहे. बहि कृत समाजातील स्त्रीमनांनी केलेली संस्कृती समीक्षा, वर्तमान काळातील भोगवट्याचा आलेख आणि मूलगामी परिवर्तनासाठी घेतलेला आंबेडकर क्रांतीचा वसा असे या कवयित्रींच्या काव्याचे स्वरूप आहे.

या संशोधन पेपर मधून काही कवयित्री व त्यांच्या कवितेचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. शब्दमर्यादा असल्यामुळे कवितेचे स्पष्टीकरण विस्तृत स्वरूपात न देता थोडक्यात दिले आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. आंबेडकरी चळवळ , परिवर्तनाचे संदर्भ, अविनाश डोळस, सुगावा प्रकाशन, ९ ऑगस्ट १९९५
२. आंबेडकरवादी मराठी साहित्य, डॉ. यशवंत मनोहर, भीमरत्न प्रकाशन १९९९
३. साहित्य : शोध आणि संवाद, डॉ. मनोहर जाधव, सुविधा प्रकाशन, पुणे ऑगस्ट २०००
४. फिर्याद : हिरा बनसोडे, समाज प्रबोधन संस्था, पुणे, मार्च १९८४